पुढारी ५-३-२०

# ट्रक लुटणाऱ्या फरार आरोपीला ६ वर्षांनी अटक

## मध्य प्रदेश राज्यातून घेतले ताब्यात

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

विरार मुंबई अहमदाबाद महामार्गावर ट्रेलर चालकाला लुटून पसार झालेल्या आरोपींना ६ वर्षानंतर मध्यवर्ती गुन्हे शाखेने अटक करून कानून के हाथ लंबे होते है हे दाखवून दिले आहे. याप्रकरणी एका फरार आरोपीला अटक केली आहे.

ट्रेलर चालक सैतानलाल हरदेव गुजर हे ३ सप्टेंबर २०१८ साली रात्री तळोजा ते जयपुर मार्गे २९ टन कॉपर घेऊन ट्रेलर वाहन क्र. आर. जे. ०९. जी. बी. २८४८ मधुन घेवून जात असताना रात्री ११.३० वाजता चे सुमारास खानिवडे टोल नाक्याचे पुर्वी काही आरोपींनी त्यांच्या कडील खाजगी गाड ट्रेलर समोर आडव्या लावुन फिर्यादी व क्लिनर यांना खाली उतरवुन जबरदस्तीने त्यांच्या खाजगी वाहनामध्ये बसविले व त्यांना बिंबी पाडा, भिवंडी, चिंचोटी व परत भिवंडी नंतर धुमाळनगर असे फिरवुन नंतर वसई येथे उतरविले व फिर्यादी यांच्या ताब्यातील ट्रेलर गाडी, २९ टन कॉपर व त्यांचा मोबाईल असा एकुण ०१, ६३, ०९, ६११ रुपये किंमतीचा मुद्देमाल आरोपीनी दरोडा घातल्या बाबत गुन्हा विरार पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला होता. काही आरोपी पकडले होते मात्र त्यातील एक आरोपी राकेशसिंह उदयसिंह राजवत कुशवाह हा गेले ६ वर्षापासुन फरार झाला होता सहा पोलीस निरीक्षक दत्तात्रय सरक यांनी तांत्रिक बाबी तपासून गुप्त माहिती द्वारे मध्यप्रदेश मधील रा. बी. टी. आय रोड, महावीर नगर, ग्राम पांढरी, पो.स्टे. उमरी, जिल्हा भिंड, येथे रहात असल्याची पक्की खबर मिळाल्या नंतर पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलीस आयुक्त अमोल मांडवे, मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो. नि.राहुल राख, यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. दत्तात्रय सरक, पो.हवा. शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, महेश वेल्हे, पो. अंम. हनुमंत सुयवंशी सर्व नेमणुक मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा तसेच स.फौ. संतोष चव्हाण, यांनी राकेश सिंह उदयसिंह राजावत उर्फ कुशवाह, वय ४८ याला सापळा रचून मध्यप्रदेश राज्यातुन अटक केली आहे.

लोकमत ५-३-२

# उत्तनच्या लॉजमधून चार जण ताब्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

- खात्री पटताच पथकाने धाड टाकून दोन पीडित तरुणींची सुटका केली. तर तपन, सिंगसह वेटर साहिल इस्लाम, दलाल शाहबुल मंडल यांना ताब्यात घेऊन उत्तन सागरी पोलिस ठाण्याच्या ताब्यात दिले.
- पोलिसांनी २ मार्च रोजी गुन्हा दाखल केला असून लॉजिंगमालक राजश्री पाटील (रा. अंधेरी) व वेश्यादलाल रमेश (रा. नायगाव) हे आरोपी आहेत.

**मीरा रोड :** भाईंदरच्या उत्तन भागातील लॉजमधून वेश्या व्यवसाय सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आल्याने परिसरात संताप व्यक्त होत आहे. वेश्या व्यवसाय चालवणारे लॉज व त्याच्या बेकायदा बांधकामांवर तोडक कारवाईची मागणी स्थानिकांनी केली आहे.

उत्तन येथील स्टेला मॉरिस रुग्णालयाशेजारी ग्रीन विला रेस्टॉरन्ट अँण्ड लॉजिंग आहे. लॉजचालक तपन सेन, व्यवस्थापक मुन्नाकुमार सिंग आणि वेटर हे लॉजमध्ये येणाऱ्या पुरुष गिऱ्हाईकांना वेश्यागमनासाठी तरुणींची मागणी केल्यास त्याचा मोबदला व रूम भाडे घेऊन वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलिस निरीक्षक समीर अहिरराव यांना मिळाली.

अहिरराव यासह उमेश पाटील, विजय निलंगे, केशव शिंदे, सम्राट गावडे, अश्विनी भिलारे, सोनाली मोरे यांच्या पथकाने सापळा रचून बोगस गिऱ्हाईक पाठवले. लॉजमध्ये त्याला वेश्यागमनासाठी दोन तरुणी पुरवण्यात आल्या. त्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

Scanned with CamScanner

लोकमत पु-पा-२.

# मराठीऐवजी गुजराती भाषेतील आरक्षण अर्ज

## भाईंदर रेल्वेस्थानकातील प्रकार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर रेल्वे स्थानकातील आरक्षण केंद्रावर मराठी भाषेऐवजी गुजराती भाषेतील आरक्षण अर्ज रेल्वे प्रशासनाकडून दिले जात असल्याच्या निषेधार्थ मनसेने कारवाईची मागणी केली आहे.

भाईंदर रेल्वे स्थानकाच्या पूर्व भागात रेल्वेच्या लांबपल्ल्यांच्या गाड्यांचे तिकीट आरक्षण केंद्र आहे. या आरक्षण केंद्रावर रेल्वे प्रशासनाकडून राजभाषा मराठीला डावलून गुजराती भाषेतील आरक्षण अर्ज दिले जात असल्याची माहिती मनसेचे शहराध्यक्ष हेमंत सावंत यांना मिळाली. त्यानंतर उपशहराध्यक्ष लीला खडसे, माथाडी कामगार सेनेचे चिटणीस चंद्रशेखर जाधव, उपचिटणीस किशोर येवले, शाखाध्यक्ष दिनेश वाढवाल, लक्ष्मण चौगुले, राजेश सावंत आदींनी स्थानक अधीक्षक भारती राजवीर यांना भेटून निषेध व्यक्त करत तत्काळ मराठी भाषेतील अर्ज उपलब्ध करण्याची मागणी केली.

मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा आहे. केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या कार्यालयात इंग्रजी व हिंदीबरोबरच मराठी भाषेचा वापर करणे बंधनकारक आहे. या संदर्भात केंद्र शासनाच्या राजभाषा विभागाकडून अधिसूचनाही जाहीर करण्यात आली आहे. त्याचे काटेकोर पालन व्हावे. मराठी राजभाषा असून, तिला डावलणे व अपमान करणे गंभीर आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाईची मागणी मनसेने केली आहे.

लोकमत पु-पा-४.

# मीरा-भाईंदरमध्ये लागणार ३९४ ठिकाणी होळी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा- भाईंदरमध्ये सार्वजनिक २२९, तर खासगी १६५ अशा एकूण ३९४ ठिकाणी होळीच्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार असल्याची माहिती परवानगीसाठी आलेल्या अर्जांवरून समोर आली आहे. होळी आणि धूलिवंदनाचा सण शांततेत, आनंदात साजरा व्हावा आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी मीरा- भाईंदर, वसई- विरार पोलिस आयुक्तालयामार्फत बंदोबस्त, मनाई आदेश व आवश्यक नियमावलीची तयारी केली जात आहे. नियमावलीबाबतचे परिपत्रक लवकरच काढण्यात येणार असून प्रत्येक पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी हे त्यांच्या हद्दीत होळी सणाचे आयोजन करणाऱ्या आयोजकांना एकत्र बोलावून होळी आणि धूलिवंदन सण शांततेत पार पडण्यासंदर्भात लवकरच बैठक घेणार आहेत. होळी- धूलिवंदनाच्या सार्वजनिक कार्यक्रमांच्या ठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त व शहरात गस्त वाढवण्यात येणार असल्याचे पोलिस सूत्रांकडून सांगण्यात आले.

Scanned with CamScanner

सकाळ ५-३-२३.

# जुन्या पेन्शनसाठी निर्वाणीचा लढा

## चौदा मार्चपासून बेमुदत संप करणार : सतेज पाटील

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : ''सत्ताधाऱ्यांनो, आर्थिक अडचणीतले निर्णय घेता, मग जुन्या पेन्शनबाबत का घेत नाही? जुनी पेन्शन लागू केली तरच माघार. अन्यथा निर्वाणीचा लढा सुरू झाला आहे, हे ध्यानात घ्या. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या भूमीत पेटलेल्या संघर्षांच्या ज्योतीचा आता वणवा पेटलाय. तो महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात पोचल्याखेरीज राहणार नाही,'' असा इशारा आमदार सतेज पाटील यांनी शनिवारी येथे दिला.

दुधाच्या भांड्यात मीठ टाकण्याची संधी कोणाला देऊ नका. चौदा मार्चला जिल्ह्यातील एकही कार्यालय सुरू राहणार नाही. याची खबरदारी घ्या, असे सांगत कितीही किंमत मोजायला लागू दे संघर्षात मागे पडू नका, असे आवाहनही त्यांनी केले. राज्य सरकारी, निमसरकारी, कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, महापालिका कर्मचारी, समन्वय समिती व जुनी पेन्शन हक्क संघटनेतर्फे




कोल्हापूर : जुनी पेन्शन लागू करावी या मागणीसाठी राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक, महापालिका कर्मचारी, समन्वय समिती व जुनी पेन्शन हक्क संघटनेतर्फे शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालयावर आज मोर्चा काढण्यात आला. मोर्चाचे रूपांतर सभेत झाल्यानंतर ते बोलत होते. येत्या नऊ रोजी होणाऱ्या अर्थसंकल्पात जुनी पेन्शनची तरतूद न झाल्यास महाविकास आघाडी सरकारतर्फे सभागृह बंद पाडण्याचा इशाराही त्यांनी दिला.

पाटील म्हणाले, ''आर्थिक सबबीचे कारण सांगून जुनी पेन्शन लागू केली जात नाही. नव्या पेन्शन योजना अन्यायकारी आहे. शेअरबाजारावर ती अवलंबून आहे. सहा टक्के महागाई वाढली की परतावा दोन टक्के मिळतो, असे चित्र आहे. त्याच्या यातना सामान्य कर्मचाऱ्यांनी भोगल्या आहेत. सतरा लाख कर्मचाऱ्यांना नवी पेन्शन योजना अमान्य आहे.''

''ही पेन्शन योजना लागू केली तर सरकार दिवाळखोरीत निघेल, असे म्हणणे सयुक्तिक नाही. कर्मचाऱ्यांचे २२ हजार कोटी सरकारकडे जमा आहेत. ते परत द्यायला सरकार तयार नाही, असे पाटील म्हणाले.

सत्ताधाऱ्यांना निवडणुकीत हिसका दाखवला गेला आहे. अदानीच्या दिवसाच्या उत्पन्नाचा आकडा कोटीत आहे. उद्योग, बँका बुडाल्या तरी सरकार त्यांना दहा हजार कोटी रुपयांची हमी देत आहे.
- अरुण लाड, आमदार

जुनी पेन्शनचा कर्मचाऱ्यांना आधार होता. ही पेन्शन योजना पुन्हा लागू व्हावी, यासाठी कर्मचाऱ्याच्या पाठीशी ताकदीने उभे राहू. हा केवळ ट्रेलर आहे, पिक्चर अजून बाकी आहे. सत्ताधाऱ्यांना सत्तेतून पायउतार करू.
- ऋतुराज पाटील, आमदार

आमदारांची पेन्शन रद्द करा. मात्र, कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन लागू करा, यासाठी आवाज उठवला. आता छत्तीस जिल्ह्यात मोर्चे निघतील. सरकारला झुकावे लागेल. अन्यथा सभागृह बंद पाडू.
— विक्रम काळे, आमदार

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पा-नं-५.

# छत्रपती संभाजीनगर नामांतराविरोधात बेमुदत साखळी उपोषण सुरू



। छत्रपती संभाजीनगर । औरंगाबाद शहराचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर केल्याच्या विरोधात नामांतरविरोधी कृती समितीने शनिवारपासून बेमुदत साखळी उपोषणाला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरुवात केली आहे. आंदोलनात एमआयएमचे खा. इम्तियाज जलील यांच्यासह विविध समाजघटक, सामाजिक कार्यकर्ते, नागरिक यांच्यासह एमआयएमचे पदाधिकारी पाठिंबा दर्शवून आंदोलनात सहभागी झाले आहेत. २७ मार्चपर्यंत हे उपोषण सुरू राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

औरंगाबाद शहराचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर करण्यात आले असून केंद्राच्या वतीने त्याची अधिसूचनाही काढण्यात आली आहे. त्यानंतर राज्य शासनानेही अधिसूचना प्रसिद्ध करीत गाव, तालुका, उपविभाग आणि जिल्ह्याचे नाव छत्रपती संभाजीनगर करण्याबाबत आक्षेप मागवले आहेत. २७ मार्चपर्यंत विभागीय आयुक्त कार्यालयात हे आक्षेप दाखल करण्याबाबत नमूद केले आहे. एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांनी याविरोधात एकीकडे न्यायालयीन लढाई लढत असताना दुसऱ्या बाजूला रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर नामांतर कृती समितीच्या माध्यमातून ४ मार्चपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्यात आले आहे. उपोषणात खा. जलील, गौतम खरात, शारेक नक्षबंदी, रमेश गायकवाड, डॉ. गफार कादरी, अब्दुल हाफीज, जमियत उलमा के खालील खान, वंचित बहुजन आघाडीचे तय्यब जफर, मोनिका मोरे यांच्यासह नागरिक सहभागी झाले होते.

## औरंगजेबाचा फोटो घेऊन आलेल्यांना पिटाळले

दुपारी काही युवक घोषणा देत दाखल झाले. काहींच्या हातात औरंगजेबाचा फोटो होता. तो दाखवत घोषणाबाजी करण्यात आली. आयोजकांच्या लक्षात ही बाब येताच त्यांनी तत्काळ युवकांच्या हातातून फोटो हिसकावून घेऊन त्या युवकांना आंदोलनातून पिटाळून लावले. संबंधित युवक हे मुकुंदवाडी भागातील रहिवासी असल्याची आणि त्यांचा संबंध एमआयएमशी नसल्याचे आयोजकांनी सांगितले. यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे.

Scanned with CamScanner

पुण्यनगरी पृ.पा.७.

# काशिमीरा येथे ऑर्केस्ट्रा बारवर पोलिसांची धडक कारवाई

## वनसंरक्षकाला अटक

**नालासोपारा :** जमीन नावावर करून देण्यासाठी लाच घेणाऱ्या वनसंरक्षकास लाचलुचपतविरोधी पथकाने रंगेहाथ अटक केली. विरारच्या मांडवी परिक्षेत्रातील वनसंरक्षक रणजीत दिनकर डोळे याने फिर्यादीस वनविभागाकडून भूमिहीन आदिवासींना वाटप करण्यात आलेल्या जमिनीपैकी ६ गुंठे जमीन तक्रारदार यांच्या नावावर करून देण्यासाठी दीड लाख रुपये प्रति गुंठेप्रमाणे सहा गुंठ्यांची एकूण ९ लाख रुपये जमिनीचे वाटप करण्यात आले, त्याच्यासाठी व त्या जागेवर बांधकाम करताना कारवाई न करण्यासाठी ५० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून २० हजार रुपये स्वीकारताना डोळे यांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांच्या विरोधात मांडवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

**मीरा रोड :** काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील पेणकरपाडा येथील मेमसाब ऑर्केस्ट्रा बारमध्ये ऑर्केस्ट्राच्या नावावर गाणे लावून अश्लील नृत्य करणाऱ्या मालक, चालक व इतरांविरुद्ध अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने कारवाई केली आहे. काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीतील मेमसाब ऑर्केस्ट्रा बारमध्ये महिला ऑर्केस्ट्रा गाण्याच्या नावाखाली परवाना नसताना मुलींकडून नृत्य करवून घेत होते. तसेच या बारचे मालक, चालक, मॅनेजर कम कॅशिअर, पुरुष सिंगर, वादक व वेटर हे मुलींना नृत्य करण्यास प्रोत्साहित करून नृत्य करवून घेत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकास मिळाली होती.


अनैतिक मानवी वाहतूक कक्षाचे पोनि. समीर अहिरराव यांनी तारालिंग कम्पाऊंड, मेमसाब ऑर्केस्ट्रा बार, काशिमीरा या ठिकाणी पोलीस पथकासह छापा टाकला. मेमसाब ऑर्केस्ट्रा बारमध्ये हिंदी गाण्याच्या व वाद्याच्या तालावर महिला सिंगर अश्लील नृत्य करत असल्याचे दिसून आले. तसेच ऑर्केस्ट्रा बारचे चालक, मॅनेजर कम कॅशिअर, सवर्मॅनेजर, वेटर, पुरुष सिंगर व वादक हे बारमधील महिला सिंगर यांना नृत्य व अश्लील नृत्य करण्यास बंदी असताना नृत्य करण्यास प्रोत्साहन देत असल्याचे दिसून आले. या वेळी रोख रक्कम व चित्रीकरण केलेली क्लीप जप्त करून त्या ऑर्केस्ट्रा बारचे चालक १, मॅनेजर कम कॅशिअर १, हॉल मॅनेजर १, वेटर २, पुरुष सिंगर १ व वादक १ असे ७ जण ताब्यात घेण्यात आले.

पुण्यनगरी पा.नं.-11

# अखेर शिझान खानला जामीन मंजूर

**वसई :** अभिनेत्री तुनिषा शर्मा आत्महत्याप्रकरणी अटकेत असलेल्या शिझान खानला शनिवारी वसई न्यायालयाने अखेर जामीन मंजूर केला. जामीन मंजूर करताना न्यायालयाने काही अटी ठेवल्या आहेत. या अटी-शर्तींचे खानला पालन करणे बंधनकारक असणार आहे. काही दिवसांपूर्वी अभिनेत्री तुनिषा शर्माला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी तुनिषाच्या आईच्या तक्रारीवरून त्याला अटक केली होती.

पालघरमधील वालीवजवळ एका टीव्ही मालिकेच्या सेटवर



२४ डिसेंबर २०२२ रोजी तुनिषा शर्माने आत्महत्या केली होती. यानंतर तुनिषाच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून शिझान खानला दुसऱ्या दिवशी अटक करण्यात आली. तो सध्या तुरुंगात आहे. वसई अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश आर. डी. देशपांडे यांनी खानची एक लाख रुपयांच्या जामिनावर सुटका करण्याचे आदेश दिले. न्यायालयाने २ मार्चच्या सुनावणीनंतर निर्णय स्थगित ठेवला होता. या प्रकरणात वालीव पोलिसांनी गेल्या महिन्यात ५२४ पानांचे आरोपपत्र दाखल केले होते. आरोपपत्र दाखल झाल्यानंतर खानने पुन्हा एकदा जामिनासाठी याचिका दाखल केली होती. यावेळी वसई न्यायालयाने खानला अटी व शर्तींसह जामीन मंजूर केला. खानला त्याचा पासपोर्ट जमा करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. तसेच न्यायालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय देश सोडून जाऊ नये, असेही त्याला सांगण्यात आले आहे.

Scanned with CamScanner

# Booked under stringent organised crime Act, man held from MP after 5 yrs

SURESH GOLANI / Mira-Bhayandar

The Central Crime Branch unit of the Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police nabbed a criminal on the run for the last five years after being booked under the stringent Maharashtra Control of Organised Crime Act (MCOCA), 1999.

Rakesh Singh Rajawat alias Kushwaha, 48, was arrested from Pandri village in Bhind district of Madhya Pradesh by a team led by Assistant Police Inspector Dattaray Sarak on Friday.

Kushwaha and his accomplices had waylaid a trailer truck near the Khaniwade toll plaza on the Mumbai-Ahmedabad Highway on Sept 3, 2018. The gang mounted an assault on the driver and cleaner of the truck and decamped with the vehicle laden with 29 tonnes of copper wire worth more than Rs1.63 crore. While some of his accomplices were arrested, Kushwaha had managed to evade the police dragnet.

**The man had waylaid a truck near Khaniwade toll plaza in September 2018. While his accomplices were caught, he fled and was on the run ever since**

Officials from the Central Crime Branch were asked to investigate the case. Based on electronic surveillance and informer input, the police arrested Kushwaha from his village on Friday. "Apart from his involvement in cases of dacoities and other criminal activities, he was also booked under relevant sections of the Indian Penal Code and the stringent MCOCA in 2019." said Police Inspector Rahul Raakh. Further investigations are underway.

# Bldrs, architect booked 8 mths after toddler's death at building site

SURESH GOLANI / Mira-Bhayandar

Nearly eight months after a two-year-old girl drowned in a water tank at an under-construction building site in Bhayandar, the police have registered an offence of negligence against four people, including the land owner, builder and architect. However, no arrests have been made so far in the case.

The tragic mishap was reported from a construction site in Rai village near Bhayandar on Aug 6, 2022. The child, Ritu Deepak Sonar, had mysteriously disappeared while playing. Her body was later recovered from an underground water tank. She had apparently slipped into the partly covered tank built at the ground level.

**The child had mysteriously disappeared while playing. Her body was later recovered from an underground water tank**

Initially, an accidental death report was registered at the Bhayandar police station. The grief-stricken family members, however, alleged negligence on the part of the construction company for not covering the tank.

Refusing to comment on the issue, Assistant Commissioner of Police Shantilal Jadhav said to contact the senior police inspector. When asked about the delay, Senior Police Inspector MP Patil said, "After examining the on-site safety measures, the process of verifying the ownership title with the municipal corporation took more time. Moreover, the suspects did not cooperate in the probe."

The accused have been identified as Pritesh Ramesh Cheddha, Nimesh Shashikant Thakkar, Sandip Mohan Patil (all builders) and the architect, Basav Raj. One of the builders is said to be an influential political leader and former municipal corporator of the area.




Scanned with CamScanner

MHT
राष्ट्रीय हिन्दी दैनिक
मुंबई हिंदमाता टाइम्स
मुंबई, रविवार 05 मार्च 2023

## एमबीवीवी मध्यवर्ती क्राइम ब्रांच को सफलता

# 6 सालों से फरार अपराधी मध्यप्रदेश राज्य से गिरफ्तार



**वसई ;** डकैती समेत मोक्का मामले में 6 साल से वांछित आरोपी को मध्यवर्ती अपराध जांच शाखा की टीम ने मध्यप्रदेश राज्य से गिरफ्तार करने में सफलता पाई है। यह कार्रवाई क्राइम डीसीपी अविनाश अंबुरे व एसीपी अमोल मांडवे के मार्गदर्शन में मध्यवर्ती अपराध जांच शाखा पीआई राहुल राख की टीम ने की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शनिवार को दी है। पुलिस ने बताया कि 3 सितंबर 2018 को शिकायतकर्ता सैतानलाल हरदेव गूजर रात्रि तलोजा से जयपुर मार्ग से 29 टन कॉपर अपने कब्जे में ट्रेलर वाहन क्र.आरजे 9-जीबी 2848 से जा रहा था,तभी रात करीब 11.30 बजे आरोपी शख्स ने अपनी निजी कार खानीवड़े टोल बूथ के सामने ट्रेलर के सामने खड़ी कर दी,शिकायतकर्ता व क्लीनर को उतार दिया और अपने निजी वाहन में जबरन बिठाया गया तथा चिबीपाडा,भिवंडी, चिंचोटी और वापस भिवंडी फिर धुमालनगर और फिर वसई में उतार दिया, आरोपियों ने आपस में मिलीभगत कर जबरन ट्रेलर गाड़ी, 29 टन तांबा व उसका मोबाइल फोन कुल 012, 63, 09, 611 रुपये की चोरी कर फरार हो गए.इस मामले में विरार थाने में कलम 495,363,120 (ब) व अन्य धाराओं के तहत केस दर्ज किया गया था। पुलिस ने बताया कि उक्त अपराध में वांछित अभियुक्तों की तलाश एवं गिरफ्तारी के संबंध में वरिष्ठ अधिकारियों द्वारा दिये गये निर्देश एवं मार्गदर्शन के अनुसार मध्यवर्ती अपराध शाखा के अधिकारियों एवं कर्मचारी ने पाया कि उपरोक्त दर्ज अपराध में नामजद आरोपी राकेश सिंह उदयसिंह राजावत कुशवाहा है,जो पिछले 6 साल से वांछित आरोपी है। पुलिस ने कहा कि तदनुसार सहा पुलिस निरीक्षक दत्तात्रेय सरक ने गुप्त मुखबिरों एवं तकनीकी गुप्तचर के माध्यम से प्राप्त सूचना के आधार पर आरोपी राकेश सिंह उदयसिंह राजावत उर्फ कुशवाह (48),निवासी-बी.टी. आय रोड, महावीर नगर,ग्राम पांढरी, पो. स्ट.उमरी,जिला भिंड, राज्य मध्यप्रदेश स्थित जाल बिछाकर 3 मार्च को हिरासत में लिया।आरोपी की जब कुशल जांच की गई तो पता चला कि उक्त अपराध में शामिल पाया गया,अपराध इससे पहले गिरफ्तार आरोपियों के खिलाफ मोक्का कानून के तहत कार्रवाई की गई थी,और उसका मोक्का कोर्ट केस नंबर 03/2019 है। विरार थाना पुलिस उक्त अपराध की आगे की जांच कर रही है।

Scanned with CamScanner

# Bldrs, architect booked 8 mths after toddler's death at building site

SURESH GOLANI / Mira-Bhayandar

Nearly eight months after a two-year-old girl drowned in a water tank at an under-construction building site in Bhayandar, the police have registered an offence of negligence against four people, including the land owner, builder and architect. However, no arrests have been made so far in the case.

The tragic mishap was reported from a construction site in Rai village near Bhayandar on Aug 6, 2022. The child, Ritu Deepak Sonar, had mysteriously disappeared while playing. Her body was later recovered from an underground water tank. She had apparently slipped into the partly covered tank built at the ground level.

**The child had mysteriously disappeared while playing. Her body was later recovered from an underground water tank**

Initially, an accidental death report was registered at the Bhayandar police station. The grief-stricken family members, however, alleged negligence on the part of the construction company for not covering the tank.

Refusing to comment on the issue, Assistant Commissioner of Police Shantilal Jadhav said to contact the senior police inspector. When asked about the delay, Senior Police Inspector MP Patil said, "After examining the on-site safety measures, the process of verifying the ownership title with the municipal corporation took more time. Moreover, the suspects did not cooperate in the probe."

The accused have been identified as Pritesh Ramesh Cheddha, Nimesh Shashikant Thakkar, Sandip Mohan Patil (all builders) and the architect, Basav Raj. One of the builders is said to be an influential political leader and former municipal corporator of the area.

Scanned with CamScanner

लोकमत

# मोक्का लागलेल्या दरोड्यातील फरार आरोपीला मध्यप्रदेशातून अटक

## मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने केली कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरार पोलिस ठाणे हद्दीतील दरोडा, मोक्क्याच्या गुन्ह्यातील सहा वर्षांपासून फरार आरोपीला मध्य प्रदेशातून गुरुवारी मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी अटक केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी दिली आहे.

३ सप्टेंबर २०१८ मध्ये फिर्यादी चालक सैतानलाल हरदेव गुजर हे रात्री तळोजा ते जयपूरमार्गे २९ टन कॉपर ट्रेलरमधून घेऊन जात होते. रात्रीच्या सुमारास खानिवडे टोलनाक्याचे पूर्वी आरोपींनी त्यांच्याकडील गाड्या ट्रेलरसमोर लावून चालक व क्लिनर यांना खाली उतरवून जबरदस्तीने खासगी वाहनामध्ये बसविले. त्यांना फिरवून नंतर वसई येथे उतरविले होते. चालकाच्या ट्रेलरमधून २९ टन कॉपर व त्यांचा मोबाइल असा १ करोड ६३ लाख ९ हजार ६११ रुपयांचा मुद्देमाल आरोपींनी दरोडा घालून जबरदस्तीने चोरला होता.

या गुन्ह्यामधील आरोपी राकेशसिंह उदयसिंह राजवत कुशवाह (४८) हा गेल्या सहा वर्षांपासून फरार होता. त्यानुसार सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय सरक यांनी या आरोपींबाबत बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे त्याला मध्य प्रदेशातून सापळा लावून गुरुवारी अटक केली. त्याचा या गुन्ह्यात सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. या गुन्ह्यातील पूर्वी अटक आरोपीविरुद्ध मोक्का कायद्यांतर्गत कारवाई केली असून, विरार पोलिस तपास करीत आहेत.

### सापळा रचून अटक



- ही कामगिरी पोलिस उपआयुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहा.पोलिस आयुक्त (गुन्हे) अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलिस निरीक्षक राहुल राख, सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय सरक, पोलिस हवालदार शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, महेश वेल्हे, हनुमंत सुर्यवंशी तसेच सहायक फौजदार संतोष चव्हाण यांनी केली आहे.

Hello Vasai
Page No. 1 Mar 05, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

# गांजा जप्त, गुन्हा दाखल

नालासोपारा : अलकापुरी रोड येथील न्यू महादेव चाळीत राहणाऱ्या गणेश गोपी बंजारा (२३) याच्या घरी गुरुवारी रात्री नऊच्या सुमारास आचोळे पोलिसांनी २०० ग्रॅम वजनाचा अडीच हजार रुपये किंमतीचा गांजा जप्त केला आहे. शुक्रवारी आचोळे पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 1 Mar 05, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner